# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **22/09/2022**

**Brief of the work done :-**

सोनसाखळी चोरणाऱ्या चोरट्यांना अटक ; मुद्देमालासह 04 आरोपी ताब्यात.

# सोनसाखळी चोरणाऱ्या आरोपींना अटक

## डी.बी. पथकाची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ▪झाकलवाडी रोडवरील गुरुकुल शाळेजवळ जयदिप उत्तम जाधव यांना बेदम मारहाण करुन त्यांच्या गळयातील ८ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, लॉकिट असा ४० हजाराचा ऐवज लुटून पोबारा करणाऱ्या चोरट्यांना केवळ दोन तासात मुद्देमालासह अटक करण्याची कामगिरी वाशिम शहर पोलिस स्टेशनच्या डीबी पथकाने पार पाडली. लुटमारीची ही घटना १९ सप्टेंबर रोजी घडली होती.

दरम्यान फिर्यादी जयदिप जाधव हे आपल्या दुचाकीने झाकलवाडी मार्गे हरीयाणा ढाबा येथे जेवण करण्यासाठी जात असतांना ३ अनोळखी इसमांनी त्यांना व त्यांचे मित्र विरल मनोज जिवनानी, यांना मारहाण केली. विरल भिमजियानी यांच्या गळयातील देखील १० ग्रॅम चांदीची चैन जबरीने तोडण्यात आली. या घटनेची रितसर तक्रार संबंधितांनी पोलिसात दिली. आरोपी लुटमार करुन पळुन गेले. या प्रकरणी वाशिम शहर येथे शहर पोलिसात अपराध क्र. ७२९ / २०२२ , कलम ३९४ ,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. लुटमारीच्या या घटनेबाबत जिल्हापोलिस अधिक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रफिक शेख , प्रभारी ठाणेदार सपोनि, राजेश कुमार गाठे यांनी सदर गुन्हयाच्या तपासाबाबत डीबी पथकास आदेश देऊन चौकशीसाठी रवाना केले. डीबी पथकाने फिर्यादित जयदिप उत्तम जाधव यांचा मित्र रवी विनोद मगर राहणार नगीना मशीद वाशिम यांच्या हालचाली व वागणे हे संशयास्पद वाटत असल्याने त्याला विश्वासात घेऊन त्याच्याकडे सदर गुन्ह्याच्या बाबतीत चौकशी केली असता त्याने सांगितले की, त्याला जयदिप जाधव यांच्या श्रीमंती बद्दल असुया वाटत असल्याने त्यानेच आरोपी आदर्श जीवन कांबळे रा. तोंडगाव याला जयदिप जाधव याच्या गळयातील सोन्याची चैन लुटण्याबाबत सांगितले. रवि विनोद मगर याचा सदर गुन्ह्यातील सक्रिय सहभाग निष्पण्ण होत आहे. त्यावरुन डीबी पथकाने तोंडगाव येथे जाऊन आदर्श जिवन कांबळे याला ताब्यात घेऊन त्याचे इतर दोन साथिदार प्रविण रामसेवक चव्हाळे, अमोल दौलत इंगोले रा. तामसाळा ता.वाशिम यांना ताब्यात घेवुन अटक केली. आरोपींनी गुन्हयाची कबुली दीली. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातील गुन्ह्यात वापरलेली टिव्हीएस सुझुकी बिना नंबरची मोटरसायकल किंमत रु १ लाख व लुटलेली सोन्याची साखळी, चांदिची चैन जप्त केली. (जि.प्र.)



सदरची कामगिरी जिल्हापोलिस अधिक्षक बच्चन सिंह अपर पोलीस अधिक्षक गोरख भामरे , उपविभागीय पोलीस अधिकारी सुनीलकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रफिक शेख व प्रभारी ठाणेदार राजेशकुमार गाठे यांच्या नेतृत्वाखाली डीबी पथकाचे सपोनि खंदारे , पोहेकॉ लालमणी श्रीवास्तव, रामकृष्ण नागरे, ज्ञानदेव मात्रे , पोशिक २४३ विठ्ठल महाले, व पोशिक संदिप वाकुडकर यांनी पार पाडली.